# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीची यशोगाथा



## प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, शिवाजीनगर, पुणे

भारतवर्षाला सुसंस्कृत, सुसंस्कारित, निष्ठावान आणि चारित्र्यसंपन्न नागरिक देणे हा राष्ट्रभक्तिचा, राष्ट्रसेवेचा उत्कृष्ट मार्ग आहे. या उद्देशाने पुण्यामध्ये गुरूवर्य मा. शंकररावजी कानिटकर आणि त्यांच्या सहकारी शिक्षकांनी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे ५ या सर्वोत्तम शिक्षणसंस्थेची स्थापना दि. १६ मे १९३४ रोजी अक्षय्यतृतीयेच्या मुहुर्तावर केली.

प्रोग्रेसिव्ह म्हणजे प्रगतीशील. प्रगतीशील म्हणजे काळाशी सुसंगत असे धोरण अवलंबणे. त्याचप्रमाणे या प्रगतीशील शिक्षणामध्ये नवीन कल्पनांचा समावेश केला जावा, या हेतूने संस्थेचे नाव “प्रोग्रेसिव्ह” हे ठेवले. “मॉडर्न” या शब्दाचा अर्थ “आधुनिक” असा आहे. कोणत्याही शिक्षण संस्थेने “मॉडर्न” असणे म्हणजे अद्ययावत तंत्रज्ञानांनी समृद्ध होऊन आधुनिक साधन सामुग्रीचा वापर करुन विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे. त्यामुळे संस्थेच्या पहिल्या शाळेचे नाव “मॉडर्न हायस्कूल” असे ठेवले. “प्रोग्रेसिव्ह”आणि “मॉडर्न” हे दोन शब्द आजही संस्थाचालकांच्या दृष्टीने परवलीचे आहेत. या दोन शब्दांमध्येच संस्थेच्या ध्येय धोरणांची संकल्पना स्पष्ट आहे. आधुनिकते बरोबरच गुरुजनांनी घालून दिलेले आदर्श, संस्कार, मूल्ये, परंपरा गेली ८६ वर्षे संस्थेने कसोशीने जपल्या आहेत. अध्ययन आणि अध्यापन याबाबतीत गुणवत्ता आणि दर्जा राखला आहे. या शिक्षणसंस्थेचे सर्व व्यवहार “स्वच्छ” आणि “पारदर्शक” आहेत. या शिक्षणसंस्थेने विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून संस्थेत देण्यात येणाऱ्या शिक्षणाची, ज्ञानाची दिशा सातत्याने विद्यार्थीभिमुख, समाजाभिमुख ठेवलेली आहे. गेली ८६ वर्षे ही तत्त्वे सर्वांनीच कसोशीने पाळली आहेत. संस्थेच्या नियामक मंडळातही सर्व स्तरातील कर्तबगार व्यक्ती आहेत.

१९६९ पर्यंत संस्थेच्या प्रगतीचा भर शालेय शिक्षणावर अधिक होता. १९३४ ते १९६९ यादरम्यान संस्थेच्या ६ शाळा सुरु झाल्या. १९७० साली मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महा, शिवाजीनगर, पुणे ५ या महाविद्यालयांची स्थापना झाली. स्थापनेच्या दिवसापासून स्वत:च्या मालकीच्या इमारतीत सुरु झालेले हे एकमेव महाविद्यालय. १९८६ पासून संस्थेच्या प्रगतीस वेग आला. विशेषत: १ जानेवारी १९९४ पासून पुण्यातील सुप्रसिद्ध, नामांकित शल्यचिकित्सक आणि मॉडर्न हायस्कूलचे माजी विद्यार्थी मा. प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांनी संस्थेच्या नियामक मंडळाचे कार्याध्यक्ष म्हणून कार्यभार स्विकारला. प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांना द्रष्टेपणाचे वरदान आहे. त्यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अधिसभा, विद्यापरिषद, व्यवस्थापन परिषद सदस्य, वैद्यक विद्याशाखेचे अधिष्ठाता म्हणून त्यांनी काम केले आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे प्रकुलगुरु, व्यवस्थापन परिषदेवर मा. राज्यपालांचे प्रतिनिधी म्हणून नियुक्ती झाली. पुण्याच्या बी.जे. मेडिकल कॉलेजमध्ये सर्जरी विषयाचे प्राध्यापक, भारतातील विविध विद्यापीठांच्या अधिकार मंडळांवर सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे. महाराष्ट्र शासन आणि भारत सरकारच्या नियोजन मंडळाच्या अनेक समित्यांवर सन्माननीय सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे. अशा चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाची व्यक्ती कार्याध्यक्षपदी असल्याने आणिनियामक मंडळाने त्यांना मोलाची साथ दिल्याने संस्थेचा विकास १९९४ पासून वेगाने झाला.

आज संस्थेच्या ६० शाखा पुणे शहर आणि पुणे जिल्हा परिसरात कार्यरत आहेत. शिशु विद्या मंदिर ते पदवी–पदव्युत्तर म्हणजे कला, वाणिज्य, विज्ञान, संगणक, अभियांत्रिकी, विधी, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, व्यवस्थापन, आरोग्यविज्ञान, कृषी जैवतंत्रज्ञान इ. सर्व विद्याशाखांच्या महाविद्यालयात सुमारे ६०,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्था आता वैद्यकीय महाविद्यालय सुरू करणार आहे. त्याचप्रमाणे संस्था अभिमत विद्यापीठाचा दर्जा मिळविण्यासाठी प्रयत्नशील आहे. मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ या महाविद्यालयाची नुकतीच “स्वायत्तता” मिळाली आहे. ऑस्ट्रेलियातील मेलबर्न विद्यापीठाशी मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ येथे चालविल्या जाणाऱ्या B.Sc. (Blended) या अभ्यासक्रमासाठी सुमारे ४ वर्षांपूर्वीच करार झाला आहे.अशाच अनेक परदेशी विद्यापीठांशी शैक्षणिक करार करण्यासाठी संस्था प्रयत्नशील आहे.

प्रतिवर्षी अनेक विद्यार्थी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेत व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवी– पदव्युत्तर परीक्षेत गुणवत्ता यादीत असतात. जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध क्रीडा प्रकारात संस्थेचे प्रतिनिधित्व करतात. कलाप्रांतात अनेक विद्यार्थी विशेष नैपुण्य मिळवित आहेत. अनेक सांस्कृतिक कलादर्शन स्पर्धांमध्ये विजेतेपद मिळवित आहेत. अनेक माजी विद्यार्थी सुद्धा समाजातील विविध क्षेत्रात गौरवास्पद कामगिरी करीत आहेत. सस्थेच्या या प्रगतीमध्ये गुरुवर्य वि. त्र्यं. ताटके, मो. गो. चाफेकर, संस्थेचे विद्यमान कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे, कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह प्रा. सौ. ज्योत्स्ना एकबोटे, प्रा. श्री. सुरेश तोडकर, ॲड. बाबासाहेब चव्हाण, डॉ. माधव नामजोशी, रवि किराड, बाळासाहेब हगवणे, चंद्रकांत शेट्टी, ॲड. दादासाहेब बेंद्रे, प्रा. सीताराम रायकर, श्री. प. स.चिरपुटकर, प्रा. डॉ. अरविंद पांडे, ॲड. माणिकराव पाटील, उपकार्यवाह प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे, प्रा. डॉ. प्रकाश दिक्षित, श्री. शरद इनामदार, श्री. चित्तरंजन कांबळे, सौ.मोनिका वैद्य आदींचा महत्वाचा वाटा आहे.